२४-९-७२ [illegible]

" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें




सन १९७०-७१ आणि १९७१-७२

वर्ष २७ आणि २८ वे

## वार्षिक-वृत्तान्त व समाहृयव

( पुढील वर्षाच्या निकल्पासह )

[ वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण–मलपृष्ठ २ पाहावें ]

प्रकाशक

स. ग. काजरेकर, बी. एस्सी.

स. चिं. मराठे, बी. ई.

कार्यवाह

**श्री. स. ग काजरेकर**

' स्वयंप्रज्ञेच्या इमारतीची उंची ' विज्ञानयुग, फेब्रुआरी १९७१.

**आकाशनिदर्शनें**

प्रतिवर्षी अनेकदा होणाऱ्या या कार्यक्रमांत यंदा मंदाई आली. याचें मुख्य कारण लो. टिळक स्मारक मंदिराची सहज उपलब्ध असलेली गच्ची मिळेनाशी झाली.

१ ) दि. ३०-११-७० ला रात्रीं बाई मोटलीबाई अध्यापिका विद्यालयाच्या गच्चीवरून आकाश निदर्शनाचा कार्यक्रम झाला. विद्यार्थिनींचे दोन गट करून संस्थेच्या दुर्बिणींतून ग्रहनक्षत्रें दाखविणें व ज्योतिःशास्त्रीय माहिती सांगणें हे कार्यक्रम झाले. २ ) संस्थेचे सदस्य श्री. शरद गजानन जोशी व श्री. जयंत शांताराम जोशी यांच्या विनंतीवरून व सहकारानें दि. २६-३-७१ ला कर्वेरोडवरील ' अपूर्वाई ' बंगल्याच्या गच्चीवरून आकाशनिदर्शनाचा कार्यक्रम झाला. संस्थेच्या दुर्बिणींतून शनी, मृगांतील अभ्रिका, वसिष्ठ-अरुंधतीचा जोडतारा इ. दाखविले. तसेंच ग्रहपथ, नक्षत्रें यांची माहिती सांगितली.

मे महिन्यांतील अनुराधा-पिधानाचे वेध घेण्याचें काम मात्र फार उत्साहानें पार पडलें—

( १ ) नूतन मराठी विद्यालयाच्या गच्चीवर दि. ३०-४-७१ ला व नंतर मे महिन्याच्या ११, १२ व १३ तारखांना रात्रीं गुरुनें वृश्चिकांतील बीटा ताऱ्याच्या केलेल्या पिधानापूर्वीचे, पिधान चालू असतानाचे व पिधानानंतरचे वेध घेतले गेले. संस्थेच्या दुर्बिणीच्या जोडीला नू. म. वि. च्या दुर्बिणीचेंही साह्य होतें. त्या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दीक्षित, शास्त्रशिक्षक श्री. गोहाड, अनेक विद्यार्थी व नागरिक यांनीं कार्यक्रमांत उत्साहानें भाग घेतला.

( २ ) श्री. काजरेकर यांनीं त्यांच्या ऑफिसच्या—ई. आर. डी. एल. या पाषाण येथील प्रयोगशाळेच्या—डायरेक्टरांच्या अनुमतीनें व एक ज्येष्ठ सहकारी डॉ. जोग यांच्या सहकारानें प्रयोगशाळेच्या ' क्वेस्टार ' दुर्बिणीनें दि. १३, १४ व १५ मेच्या रात्रीं उपरोक्त अनुराधा पिधानाचे वेध व फोटो घेतले व दि. १७-५-७१ च्या दैनिक 'सकाळ'मध्यें तद्विषयक माहितीसह प्रसिद्ध केले.

**इतर व्यक्ती, संस्थांशी संपर्क, सहकार**

परिसंस्थेचे व अन्य अनेक संस्थांचे अध्यक्ष आणि महाराष्ट्रांत सुबोध शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणाऱ्यांचे ज्येष्ठ अग्रणी प्रि. गो. रा. परांजपे यांनीं ८१ व्या वर्षांत पदार्पण केलें त्यानिमित्त ज्योतिर्विद्यापरिसंस्था, सृष्टिज्ञान, मराठी विज्ञान परिषद इ. संस्थांनीं त्यांचा सत्कार केला. फेब्रुआरी १९७१ च्या



सृष्टिज्ञानच्या प्राचार्य परांजपे विशेषांकांत प्रा. ना. म. आठवले, रँ. वि. वा. नारळीकर आदींनी प्राचार्यांच्या गुणवर्णनपर लेख लिहिले.

महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाचे पदाधिकारी श्री. बा. रं. सुंठणकर यांनीं रविवार दि. ३-१-७१ च्या अभ्यास मंडळास भेट दिली. मंडळानें हातीं घेतलेल्या विज्ञानमालेच्या प्रकाशनाची माहिती सांगून त्यांनीं परिसंस्थेच्या सदस्यांकडून लेखनाची अपेक्षा केली.

मद्रासच्या Astrological Association चे पदाधिकारी श्री. श्रीकंठन् यांनीं दि. २-५-७१ ला संस्थेस भेट दिली, व त्यांच्या संस्थेच्या चालू असलेल्या व संकल्पित कार्याची माहिती सांगितली. परिसंस्थेनें आपल्या प्रकाशनांचा एक संच श्री. श्रीकंठन् यांना भेट दिला. श्री. श्रीकंठन् यांनीं आपल्या संस्थेचें कार्य पाहून समाधान व्यक्त केलें.

**कार्यालयाचें स्थलांतर**

सुमारें ८ वर्षें परिसंस्थेकडे वापरास असलेली लो. टिळकस्मारक मंदिरांतील प्रशस्त जागा, मंदिराची पुनर्बांधणी व्हावयाची असल्यानें, या वर्षी सोडावी लागली. कार्यालयाकरतां दुसरी सोयीची जागा कुठेंही मिळत नव्हती. अशा वेळीं प्रि. परांजपे यांनीं उदार मनानें आपल्या बंगल्याच्या आवारांतील एका बंदिस्त खोलींत संस्थेचें ग्रंथालय इ. सामान हलवण्यास अनुमती दिली.

दि. १४–११–७० ला कार्यालयाचें स्थलांतर झालें. तेव्हांपासून दर रविवारच्या अभ्यासमंडळाच्या तसेंच प्रशासक मंडळाच्या सभा याच जागेंत भरतात. प्रि. परांजपे यांचे आभार मानणें म्हणजे संस्थेनें स्वतःचेच आभार मानण्यासारखें अनौचित्याचें होईल; पण अडचणीच्या वेळीं त्यांची ही मोठीच मदत झाली हें अवश्य नमूद केलें पाहिजे.

**ग्रंथालयांत भर**

Astronomical Ephemeris—1972

**नियतकालिकें**

( १ ) USIS कडून प्रसिद्ध होणारीं नियतकालिकें ' SPAN ' व ' अमेरिकन वार्ताहर '

( २ ) सृष्टिज्ञान.

( ३ ) रॉयल ऑब्झर्व्हेटरी बेल्जियमचें ' इयरबुक '

G. D. APTE & CO
Chartered Acountants
5/4/7

Schedule VIII
Vide Rule 17 (1)

Phone : 57872
United Western Building
Laxmi Road, Poona 2
Dated 24th July, 1972

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA

Balance Sheet as at 30th June, 1972.

| FUNDS AND LIABILITIES | Rs. P. | ASSETS | Rs. P. |
|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus : | | Library Books : | |
| As per last B/S | 1,983–25 | As per last B/S. 1,117–55 | |
| 1 ) Research Fund. | | Additions during the year. 57–18 | |
| As per last B/S. 4,000–00 | | 1,174–73 | |
| Provision during the year. 500–00 | 4,500–00 | Less : Depreciation 117–47 | 1057–26 |
| 2 ) Life Member Subscriptions. | 701–00 | Furniture & Fixtures : | |
| As per last B/S. | | As per last B/S. 373–00 | |
| | | Less : Depreciation. 37–30 | 335–70 |
| 3 ) Building & Equipment Fund. | | Equipment : | |
| As per last B/S. 3,212–00 | | As per last B/S. 1,205–72 | |
| Additions during the year. 25–00 | 3,237–00 | Additions during the year. 68–99 | |
| 4) Jubilee Fund. | | 1,274–71 | |
| As per last B/S. 222–00 | | Less : Depreciation. 127–47 | |
| Less : Transferred to I/S A/c. 222–00 | Nil | | 1,147–24 |
| Income and Expenditure A/c | | Stock of publications (books) | 2,265–30 |
| As per last B/S 1186-15 | | Cash and Bank Balance : | |
| Surplus or deficit as per I/E A/c. 973–75 | 212–40 | [ a ] Bank Accounts 5,575–15 [ in the name of the Trust ] | |
| | | —Secretary 253 00 | |
| Total Rs. | 10,633–65 | Total Rs. | 10,633–65 |



The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona 24th July, 1972
Trustees : Sd. S. G. Kajarekar, Secretary
Sd. S. V. Apte, Treasurer.

As per our/my report of even date
Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants
Auditors.

G. D. APTE & CO.
Chartered Accountants

Schedule IX
Vide Rule 17 (I)
Registered No. F–44

Phone : 57872
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona–2
Dated : 24th July, 1972

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA
Income and Expenditure Account for the year ending 30th June 1972

| EXPENDITURE | | Rs. P. | INCOME | | Rs. P. |
|---|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses : | | | By Interest On Bank Accounts | | 227–00 |
| Salary | 304–60 | | By Donations in cash or kind | | 25–00 |
| Stationery & Printing | 53–82 | | Profit on sale of Books : | | |
| Contingencies | 10–65 | | Selling price of books. | 57–36 | |
| Postage | 26–45 | | Less : Cost price | 19–12 | |
| Transport charges | 4–15 | | | | 38–24 |
| Total Rs. | | 399–67 | Other subscriptions. | | 300–00 |
| To Expenditure on object of the Trust : | | | By Transfers from Reserves ( Jubilee Fund ) | | 222–00 |
| Educational : Lectures, Study circle etc. | | 141–42 | By Deficit carried over to Balance Sheet | | 973–75 |
| To Miscellaneous Expenses : | | | | | |
| Jubilee Expenses. | 306–00 | | | | |
| Refund of Grant to Government. | 132–00 | | | | |
| Total Rs. | | 438–00 | | | |



| EXPENDITURE | | Rs. P. | INCOME | | Rs. P. |
|---|---|---|---|---|---|
| To Depreciation : | | | | | |
| Library Books. | 117–47 | | | | |
| Furniture & Deadstock. | 37–37 | | | | |
| Equipment A/C | 127–40 | | | | |
| Total Rs. | | 282–24 | | | |
| To Research Reserve Fund. | | 500–00 | | | |
| Building & Equipment Fund. | | 25–00 | | | |
| Total Rs. | | 1,786–33 | Total Rs. | | 1,786–33 |

Dated at Poona : 24th July, 1972.
Trutsees Sd. S. G. Kajrekar, Secretary.
Sd. S. V. Apte, Treasurer.

As per our/my report of even date
Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants,
Auditors.

(a) Assessment, Cesses and other Govt. or Municipal Taxes.

(b) Ground rent payable to the superior landlord.

(c) Insurance premia.

(d) Repairs at $8\frac{1}{3}$ per cent of gross rent of buildings.

(e) Cost of collection at 4 per cent of gross rent of Buildings let out.

(ix) Cost of collection of income or receipts from securities, stocks, etc. at 1 per cent of such income.

(x) Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at $8\frac{1}{3}$ per cent of the estimated gross annual rent.

Income liable to contribution Rs. NIL.

Dated at Poona : 20th July, 1972

Trustees : Sd. S. G. Kajarekar, Secretary,
Sd. S. V. Apte, Treasurer.



## JYOTIRVIDYA PARISANTHA,

### Receipts and payments Account for the year ending 30th June 1972

| Receipts | | Rs. Np. | Payments | | Rs. Np. |
|---|---|---|---|---|---|
| 1 ) Subscription | | | 1. ESTABLISHMENT EXPENSES : | | |
| Ordinary Members and School | | 300–00 | a ) Salary | 304–60 | |
| 2 ) Donations ( Petty Doations ) included in Building & Equipment Fund ) | | 25–00 | b ) Stationery & printing | 53–82 | |
| | | | c ) Contingencies | 10–65 | |
| | | | d ) Postage | 26–45 | |
| 3 ) Interest on Bank A/c. | | 227–34 | e ) Transport charges | 4–15 | |
| 4 ) Sale of Books | | 57–36 | | | 399–67 |
| Opening Balance As on. 1–7–71 : | | | 2. MISC. Expenditure on object. ( Study Circle, lecturers etc) | | 141–42 |
| Cash–in–hand | 317–10 | | | | |
| : Cash at Bank | 6065–31 | | | | |
| | | 6,382–41 | 3. Jubilee Expenses | | 306–00 |
| | | | 4. Refund of Grant to Govt. | | 132–00 |
| | | | 5. Sundry Creditor ( Temporary advance paid ) to Shri.M.N.Gokhale | | 58–70 |
| | | | 6. Purchase of books | | 57–18 |
| | | | 7. Equipments | | 68–99 |
| | | | Closing Balance As on : 31–6–72 | | |
| | | | Cash–in–hand | 253–00 | |
| | | | : Cash at Bank | 5,575–15 | |
| | | | | | 5,828–15 |
| | | 6,992–11 | | | 6,992–11 |

Checked and found correct,
Sd. S. G. Phansalkar
Internal Auditor.

G. D. APTE & CO.
Chartered Accountants
1/4/7

Phone : 57872
United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2

Dated : 24th July, 1972

With the Assistant Charity Commissioner, Poona

In the matter of Act XXIX of 1950

and

In the matter of

JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Public Trust

Public Trust No. F–44

Audit for the year ending 30th June, 1972

We, the undersigned Auditors, hereby report that :—

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the Rules;

(b) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;

(c) The vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;

(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by us were produced before us;

(e) Inventory certified by the trustee of the movables of the public trust has been maintained;

(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;

(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust;

(h) The amounts of outstandings for more than one year are Rs. NIL and the amounts written off are Rs. NIL.

(i) Tenders were/were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000–00. Not applicable.

(j) Any money of the public trust has not been invested contrary to the provisions of Sec. 35.

(k) Alienations of the immovable property contrary to the provision of Sec. 36 have not Come to our notice.

G. D. APTE & CO.
Chartered Accountants



G. D. APTE & CO.
Chartered Accountants
5/4/7

Schedule IX C
Vide Rule 32
Registered No. of Public Trust
F–4

Phone : 57872
United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2.

Dated 24th July, 1972

Statement of Income liable to contribution for the year ending 30th June, 1972.

Name of Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

| | Rs. | Rs. |
|---|---|---|
| Gross annual income : | | 590–58 |

Details of income not chargeable to contribution under Section 58 and Rule 32 :

(i) Donation to corpus.
(ii) Donations
(iii) Grants by Government and other Local Authorities.
(iv) Interest on Sinking or Deprecia-tion Fund.
(v) Amount spent for the purpose of education.
(vi) Amount spent fot the purpose of medical relief.
(vii) Deductions out of income from lands used for agricultural purposes.
  (a) Land Revenue and Local Fund cess.
  (b) Rent payable to superior landlord.
  (c) Cost of productions, if lands are cultivated by trust.
(viii) Deductions out of income from lands used for non-agri-cultural purposes.

The Institute is a public Trust exclusively for advancement and propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31 (1) of the Bombay Public Trust Rules, 1951.

**आभार—**

२७ व्या व २८ व्या अशा दोन वर्षांचे अहवाल आपणांपुढे ठेविले आहेत; त्यांवरून, अडचणींच्या परिस्थितीतूनही संस्थेची प्रगती कशी चालू आहे हें आपल्या नजरेस येईल. ही प्रगती सदस्यांच्या, हितचिंतकांच्या, विज्ञानप्रेमी जनतेच्या व विज्ञानप्रसार करणाऱ्या इतर संस्थांच्या सहकारामुळेच होऊं शकली. त्यांचे येथें आभार मानतो.

या प्रसंगी विशेष आभार मानावयाचे ते अधीक्षकांचे. संस्थेचे अंतर्गत अधीक्षक श्री. श्रीपाद गोविंद फणसळकर व सरकारमान्य ऑडिटर्स मे. जी. डी. आपटे आणि कंपनी यांनी, या वेळी दोन वर्षांचे हिशेब तपासण्याचे काम असूनहीं, ते काम फार थोड्या दिवसांच्या अवधीत, काळजीपूर्वक आणि नेहमीप्रमाणेच विनामूल्य करून दिले. मे. जी. डी. आपटे यांची संस्थेला प्रतिवर्षीची ही एक देणगीच असते असें म्हणणें इष्ट ठरेल. दोन्ही ऑडिटर्सचे व उपरोक्त सर्व व्यक्तींचे आणि संस्थांचे मनःपूर्वक आभार मानून हे निवेदन संपवितो.

आपले

पुणें, २३ ऑगस्ट १९७२

स. ग. काजरेकर
स. चिं. मराठे



## ज्योतिर्विद्या परिसंस्था १९७२—७३ चा निकल्प

| आय | | व्यय | | | |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य सदस्य वर्गणी | ४५०—०० | कचेरी खर्च | | | |
| देणग्या | २०००—०० | वेतन, विशेष वेतने | | | ८००—०० |
| अनुदान, शासकीय | १५०—०० | जागा भाडे | | | ६००—०० |
| ,, महापालिका | ३००—०० | इतर | अहवाल मुद्रण | २०० | |
| व्याज — | २००—०० | | स्टेशनरी मुद्रण | ५० | |
| आजीव सदस्य शुल्क | ५००—०० | | प्रचार मुद्रण | ५० | ३००—०० |
| प्रकाशन विक्री... | २०००—०० | | टपाल हशील | | २००—०० |
| | ५६००—०० | उद्देश कार्य-खर्च | | | २००—०० |
| अपेक्षित तूट | १०००—०० | | ग्रंथसंग्रह | | |
| | ६६००—०० | | अभ्यास मंडळ, स्फुट व्याख्यानें | | |
| | | | व्याख्यानमाला. खगोल निदर्शनें | | |
| | | | चित्रपट, विक्री कमिशन | | ५००—०० |
| | | साधन संभार | प्रायोगिक | | १०००—०० |
| | | प्रकाशन | | | ३०००—०० |
| अपेक्षित तूट संस्थेच्या शिलकेतून खर्च करून भरून काढण्यात येईल. | | | | | ६६००—०० |

२१–५–७२–'गेल्या पांच वर्षांतील अंतराळ संशोधन' महात्मा फुले वस्तु संग्राहलय

६–६–७२ 'हवेचें प्रदूषण' पुणें आकाशवाणी

**श्री. य. रा. नेने :**

२३–११–७१ 'समुद्र व वातावरण' यामधील 'क्रिया व प्रतिक्रिया' पुणें आकाशवाणी.

**श्री. स. ग. काजरेकर :**

१७–११–७१ 'निर्वाताची कथा'–महात्मा फुले वस्तु संग्रहालय

४–३–७२ 'पृथ्वीच्या गती' स. प. कॉलेज,–भूगोल विभाग.

**स्फुट लेखन, ग्रथ लेखन, ग्रंथ परीक्षण**

**डॉ. मो. वा. चिपळूणकर :**

( १ ) 'आधुनिक दीपगृहें' विज्ञान युग, जुलै १९७१

( २ ) अश्मयुगीन मानवानें अजस्र पाषाणांनीं लिहिलेलीं स्मृतिचिन्हें, विज्ञान युग, आक्टोबर १९७१

( ३ ) 'म्हणे जगांतील सर्व घड्याळें थांबलीं' विज्ञानयुग, फेब्रुवारी १९७३

**श्री. मो. ना. गोखले :**

( १ ) 'परिसराचे दूषितीकरण' साप्ताहिक स्वराज्य १५–८–७१

( २ ) 'दूध–एक पायस' सृष्टिज्ञान ऑक्टोबर–नोव्हेंबर १९७१

**श्री. वि. वि. मोडक :**

( १ ) 'वृश्चिक राशीतील अनुराधा बीटाचा गुरूने ग्रास घेतला'–'विज्ञानयुग जुलै ७१

( २ ) 'आज दिसणारे खग्रास चंद्रग्रहण' केसरी ६–८–७१

( ३ ) 'असे झाले चंद्रग्रहण' विज्ञानयुग सप्टेंबर ७१

( ४ ) 'शुक्रवार ३१ मार्च ७२ ची शनि-मंगळ युति' केसरी २७।३।७२

( ५ ) 'आकाशातील ज्योतींच्या शर्यति' केसरी २५–५–७२

**सात-इंची दुर्बिणीची निर्मिती :**—यंदाच संस्थेचे सदस्य झालेल्या कु. अरुणा जोशी व श्री. शिरीष जोशी या विद्यार्थ्यांनीं प्रा. ना. म. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली काम करून एक ७ इंच व्यासाच्या आरशाची ( परावर्ती ) दुर्बीण



तयार केली. दि. २९–१०–७१ ला अभ्यास मंडळाचे सदस्य ही दुर्बीण बघण्यास गेले होते.

**ग्रंथालयांत भर. पुस्तकें :**

1 ) Nautical Almanac for 1972
2 ) The Observers' Book of Astronomy
3 ) Stars
4 ) Nautical Astronomy
5 ) A-Z The soviet Encyclopedia of Space Flight.
६ ) लीलावती दर्शन—प्रा. ना. ह. फडके.

**नियतकालिकें :**

१ ) USIS कडून प्रसिद्ध होणारी नियतकालिके 'SPAN' व 'अमेरिकन वार्ताहर'
२ ) सृष्टिज्ञान
३ ) रॉयल ऑब्झर्वेटरी बेल्जियमचे 'इयर बुक'

**नवसदस्यांचें स्वागत**

या वर्षी पुढील व्यक्तींना संस्थेचें सदस्यत्व दिलें.

सामान्य सदस्य :

१ ) श्री. अनंत रघुनाथ पटवर्धन, बी. एस्सी.
२ ) श्री. शिरीष प्रभाकर जोशी.
३ ) कु. अरुणा यशवंत जोशी
४ ) श्री. चंद्रकांत सदाशिव कुलकर्णी बी. ई.
५ ) श्री. विलास गजानन जोशी, बी. एस्सी.
६ ) श्री. आनंद नारायण जोशी, डी. एम. ई.
७ ) श्री. य. वा. गोडबोले.
८ ) श्री. प्रभाकर हरि पाध्ये, इंजीनिअर.
९ ) श्री. सोमनाथ जगन्नाथ सुतावणी, डिप्. टेक. इलेक.

**चिरवियोग :**

महात्मा फुले विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व संस्थेचे हितचिंतक डॉ. का. रा. कापरे, एम्. ए., एम्एड्, पीएच. डी. ह्यांचे दि. २७-९-७१ ला दुःखद निधन झालें. हे विद्यालय परिसंस्थेचे संस्था-सदस्य होतें.

विज्ञान व ज्योतिषशास्त्र या विषयावरील नियतकालिकांतील लेखांचें वाचन व चर्चा नेहमीप्रमाणें घडून आलीच; पण त्याशिवाय पुढील कांहीं महत्त्वाच्या विषयांवर चर्चासत्रें झालीं.

( १ ) ११–७–७१ पुणें येथील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स या संस्थेचे सेक्रेटरी श्री. लोकगारीवार यांनीं ' रशिया व अमेरिका यांच्या अवकाशयानांच्या उड्डाणांच्या तिथींसंबंधींचें ' आपलें संशोधन मांडलें. या विषयावर बैठकींत चर्चा झाली. त्यांत डॉ. चिपळूणकर, श्री. गोखले, श्री. काजरेकर यांनीं भाग घेतला.

( २ ) १५–८–७१ श्री. जी. के. गोडबोले यांनी ' आर्यसंगीतांतील शुद्ध स्वर ' या विषयावरील आपल्या संशोधनाचें विवेचन केलें. नंतर या विषयावर डॉ. हेमचंद्र मोडक, प्रा. द. श्री. जोग, श्री. ह. वि. दात्ये या तज्ज्ञ मंडळीनीं चर्चा केली.

( ३ ) २९–८–७१ ' आइनस्टाईनच्या सापेक्षता वादाचे एक अभ्यासक मुंबईचे श्री. द. शां. मोकाशी यांनीं प्रस्तुत सिद्धांतांतील त्यांना प्रतीत झालेल्या कांहीं शंकांचें विवेचन केलें.

( ४ ) ५–९–७१ श्री. गोखले यांनी ' Energy of a Body Moving in Orbit ' या विषयांवर माहिती सांगितली.

( ५ ) १२–९–७१ प्रा. य. शं. पाटणकर यांनी प्रकाशाचे दिशादेशन ( पोलरायझेशन् ) व संबंधित पदार्थांच्या रेणूंची रचना याविषयीं विवेचन केले.

( ६ ) ६–२–७२ प्रा. ना. ह. फडके यांनी भास्कराचार्यांच्या जन्मस्थानासंबंधी आपल्या संशोधन कार्याचा परिचय करून दिला.

## आकाश-निर्दशनें—

( १ ) १५–११–७१ नूतन मराठी विद्यालयाच्या गच्चीवरून विद्यालयाच्या व संस्थेच्या दुर्बिणींतून विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना गुरु, शुक्र, बुध दाखविले व आनुषंगिक माहिती सांगितली.

( २ ) २८–११–७१ रात्रीं ७॥ ते ८॥ च्या दरम्यान तत्कालीन प्रकाशबंदीचा फायदा घेऊन चिमणबागेंतील श्री. कुलकर्णी यांच्या गच्चीवरून प्रा. आठवल्यांच्या नव्या दुर्बिणीच्या साह्यानें चंद्र, शनि, मंगळ आणि नक्षत्रें यांच्या दर्शनाचा कार्यक्रम झाला.

( ३ ) ६–१–७२ ला पहाटे नव्या पेठेंतील श्री. शंकरराव कुलकर्णी कुठरेकर यांच्या गच्चीवरून उपस्थितांना गुरु, बुध, युति दुर्बिणींतून दाखविली.

( ४ ) १६–२–७२ मुकुंदनगरमधील महाराष्ट्र मंडळाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेंत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्री. काजरेकर यांनी इंग्रजींतून ज्योतिष्यकीय



माहिती सांगितली व नंतर दुर्बिणींतून शुक्र, मंगळ, वसिष्ठ–अरुंधती जोडतारा इ० दाखविले.

## इतर व्यक्ती, संस्थांशी संपर्क, सहकार—

( १ ) शनिवार दि. १३–११–७१ ला सायंकाळीं चार वाजतां अभ्यास मंडळाचे सदस्य मेसर्स ए. जी. जोशी आणि कंपनीचा शॅडोलेस लॅम्पचा कारखाना बघण्यास गेले होते. तेथे संचालक श्री. जोशी बंधू यांनी या दिव्याचें शास्त्र व निर्मितीचे तंत्र यांची माहिती दिली.

( २ ) रविवार दि. २१–११–७१ या दिवशीं ज्योतिर्विद्या परिसंस्था, मराठी विज्ञान परिषद, पुणें विद्यापीठ, नॅशनल् केमिकल् लॅबोरेटरी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि सृष्टिज्ञान मासिक या संस्थांनीं डॉ. सर **चंद्रशेखर वेंकटरामन्** यांचा पहिला स्मृतिदिन साजरा केला. या प्रसंगीं भाषणें, निबंध-वाचन, चित्रपट इ. कार्यक्रम झाले.

( ३ ) रविवार दि. २१–५–७२ ला रात्रीं ८ ते १० इंजिनिअरिंग कॉलेजच्या इन्स्ट्रुमेंटेशन् डिपार्टमेंटचे प्रा. श्री. मुंगी व त्यांचे शिष्य यांनीं तयार केलेली बारा-इंची परावर्ती दुर्बिण बघण्याकरता अभ्यास मंडळाचे सदस्य गेले होते. तेव्हां तिच्या रचनेसबंधीं व तयार करतांना येणाऱ्या अडचणींसंबंधीं चर्चा झाली.

## संस्थेचें ज्ञानप्रसाराचें कार्य :

### व्याख्यानें, व्याख्यानमाला :—

प्रस्तुत वर्षीं संस्थेनें श्री. मा. भ. पंत यांची " **ऋग्वेदांतील ज्योतिःशास्त्र** " या विषयाच्या अनुषंगानें खालीलप्रमाणें तीन व्याख्यानें घडवून आणलीं.

( १ ) दि. २५–१२–७१ ' शास्त्रीय दृष्टिकोनांतून कांहीं वैदिक देवता '
( २ ) दि. २६–१२–७१ ' दीर्घतमस् आणि सूर्य '
( ३ ) दि. २७–१२–७१ ' अस्यवामस्य सूक्त आणि कांहीं ज्योतिःशास्त्रीय सिद्धांत '

हीं व्याख्यानें न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहांत झालीं. व्याख्यानांना तज्ज्ञ व अभ्यासू मंडळी उपस्थित होती.

संस्थेच्या सदस्यांनीं इतर संस्थांच्या निमंत्रणांवरून दिलेलीं स्फुट व्याख्यानें—

### श्री. मो. ना. गोखले :—

२०–११–७१–' विश्वकल्पनेबाबत आधुनिक संशोधन '–महात्मा फुले वस्तु संग्रहालय



प्रा. ना. म. आठवले अध्यक्षांच्या हस्ते शाल व श्रीफल स्वीकारीत आहेत.



श्री. चिन्मुळगुंद प्रि. परांजपे यांचा सत्कार करतांना.



कार्यकर्त्यांनीं अशीं वेधोपयोगीं उपकरणें स्वतः तयार करण्याचें तंत्र प्रत्यक्षांत आणावें, असें आवाहन त्यांनीं केलें. संस्थेचे प्राध्यक्ष प्रा. नारळीकर यांनीं दुर्बिणीचा स्वीकार केला व आपल्या भाषणांत प्रा. आठवले यांच्या दीर्घ तपश्चर्येचें कौतुक केलें.

श्री. गोखले यांनीं संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा व त्यांनीं संस्थेकरतां केलेल्या भरीव कार्याचा परिचय करून दिल्यानंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. चिन्मुळगुंद यांच्या हस्तें शाल व श्रीफल देऊन पुढील ज्येष्ठ मंडळींचा सत्कार करण्यांत आला.

( १ ) प्रा. स. वि. आपटे
( २ ) श्री. द. गो. फडके
( ३ ) डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ४ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. गो. रा. परांजपे

या प्रसंगीं प्रा. डी. डी. कापडिया व प्रा. मो. ल. चंद्रात्रेय या दिवंगत व्यक्तींची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं.

सत्कारित व्यक्तींच्या भाषणानंतर समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. आपटे यांचें भाषण झालें. त्यांनीं संस्थेच्या कार्याची प्रशंसा करून विद्यार्थ्यांनीं व तरुणांनीं या शास्त्राकडे अधिक लक्ष द्यावें असें आवाहन केलें व शिक्षण खात्याच्या सहकार्याचें आश्वासन दिलें. नंतर अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांनीं पुणें शहरांत सुसज्ज अशी वेधशाळा स्थापन करण्यासंबंधीं संस्थेनें प्रयत्न करावेत अशी सूचना केली.

वरील कार्यक्रमाचा वृत्तांत स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला होता. त्याचप्रमाणें दि. २७-७-७१ च्या सायंकाळच्या कार्यक्रमात पुणें आकाशवाणीनें तो वार्तांचित्र म्हणून प्रसारित केला.

## सभा, बैठकी

### प्रशासक मंडळाची सभा—

दि. ११-६-७२ रोजीं भरलेल्या प्रशासक मंडळाच्या सभेंत सन १९७०-७१ चा वृत्तांत व ताळेबंद सन १९७१-७२ च्या अहवालासोबत प्रकाशित करून निकाय सभेपुढें मांडावा असें ठरलें.

### अभ्यास मंडळ—

नित्याप्रमाणें दर रविवारीं संध्याकाळीं ४ ते ६ या वेळांत अभ्यास मंडळाची बैठक भरत असे. या बैठकीस ८-१० सदस्य उपस्थित असत. अवकाश



समारंभाचे अध्यक्ष डॉ. मो. वा. चिपळूणकरांना शाल श्रीफल अर्पण करीत आहेत.



पंडित श्री. वि. धों गोरेशास्त्री सत्काराचा स्वीकार करीत आहेत.



प्रा. वि. वा. नारळीकर, संस्थेचे प्राध्यक्ष भाषण करीत आहेत.



प्रि. गो. रा. परांजपे भाषण करीत आहेत.
समारंभाचे अध्यक्ष श्री. पां. ज. चिन्मुळगुंद, आय्. सी. एस्. यांच्या हस्ते परिसंस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार.



प्रा. स. वि. आपटे सत्काराचा स्वीकार करीत आहेत.



श्री. द. गो फडके शाल व श्रीफल सस्मित स्वीकारीत आहेत.

(८) श्री. वि. वि. मोडक, जी. डी. सी., जी. सी. सी.
(९) श्री. श्री. शं. पतके, एम्. ए., बी. टी.
(१०) श्री. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.

**अधीक्षक :—** ( अन्तर्गत समान्वय–निरीक्षक )
श्री. श्रीपाद गोविंद फणसळकर, बी. ए.

**तद्विद्य मंडळ :—** (Academic Council)
(१) प्रि. गो. रा. परांजपे
(२) प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर
(३) प्रा. स. वि. आपटे
(४) प्रा. ना. म. आठवले.
(५) प्रा. द. श्री. जोग
(६) श्री. मा. भ. पंत ( निमंत्रक )

## वृत्तांत–वर्षांतील परिसंस्थेच्या कार्याचें इतिवृत

### रौप्य महोत्सव

सन १९६९–७० या वर्षी संस्थेस २५ वर्षें पूर्ण झालीं. त्यानिमित्त संकल्पिलेला रौप्यमहोत्सव यंदाच्या वर्षीच्या प्रारंभास साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं संस्थेच्या स्थापनेपासून तिच्या अभिवृद्धीसाठीं झटणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार तसेंच संस्थेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते **प्रा. ना. म. आठवले** यांनीं संस्थेस देऊ केलेल्या स्वरचित दुर्बिणीचा स्वीकार करण्याचा समारंभ हे दोन कार्यक्रम आयोजित केले होते.

या समारंभाचें अध्यक्षस्थान संस्थेचे एक हितचिंतक **श्री. पां. ज. चिन्मुळगुंद**, आय. सी. एस., माजी सचिव शिक्षण व गृहखातें महाराष्ट्र राज्य यांनीं स्वीकारलें होतें व प्रमुख पाहुणे म्हणून माननीय **श्री. त्र्यं. आ. आपटे**, संचालक उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, हे उपस्थित होते. हा समारंभ टिळक रोड, न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहांत २५–७–७१ रोजीं सायंकाळीं साजरा करण्यांत आला. कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रांतील नामवंत व्यक्ति तसेंच इतर विज्ञानप्रेमी मंडळी उपस्थित होती.

प्रथम प्रा. परांजपे यांनीं परिसंस्थेच्या कार्याचा व प्रा. आठवले यांचा परिचय करून दिल्यानंतर, प्रा. आठवले यांनीं आपल्या दुर्बिणीच्या रचनेचें वर्णन करून ती परिसंस्थेस भेट दिली असल्याचें जाहीर केलें. या दुर्बिणीच्या साह्यानें खूप वेध घेतले जावेत, ज्ञानाचा प्रसार करण्यात यावा, एवढेंच नव्हे तर संस्थेच्या



प्रा. ना. म. आठवले यांनी परिसंस्थेच्या रौप्य महोत्सवाचे प्रसंगी देणगी दिलेली ४ इंच व्यासाची दुर्बिण.

| Liabilities : | | Assets : | |
|---|---|---|---|
| For Advances | 58–70 | Stock of publications ( books ) | 2,284–42 |
| Income and Expenditure A/c As per last B/S 2,038–47 Less : Deficit as per I/E A/c. 852–32 | 1,186–15 | Cash and Bank Balance : | |
| | | [ a ] Cosmos Co–op. Urban Bank Accounts | 6,065–31 |
| | | [ b ] With the Secretary | 317–10 |
| Total Rs. | 11,363–10 | Total Rs. | 11,363–10 |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona : 20th July, 1972
Trustees Sd. S. G. Kajarekar, Secretary
Sd. S. V. Apte, Treasurer

As per our/my report of even date
Chartered Accountants
Sd. G. D. Apte & Co.
Auditors



# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

( ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् )

**स्थापना :––गणेश चतुर्थी शके १८६६ ता. २२–८–१९४४**

## सन १९७१–७२ चा ( २८ व्या वर्षाचा वृत्तांत )

प्रिय सदस्य,

ता. ३० जून १९७२ ला संपणाऱ्या संस्थेच्या २८ व्या वर्षाचा हा वार्षिक वृत्तांत व समाव्यय, आवश्यक त्या पत्रकासह सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. सतत प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आतां २९ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे.

**वृत्तांत–वर्षातील पदाधिकारी :—**

**प्रशासक मंडळ** [ Goverining Council ]

**प्राध्यक्ष :** प्रा. वि. वा. नारळीकर, एम्. ए. ( कॅन्टॅब ), पुणें विद्यापीठातील लो. टिळक अध्यासनाचे गणिताचे प्राध्यापक.

**अध्यक्ष :** प्रि. गो. रा. परांजपे, एम्. एस्सी., एफ. एन्. आय., ओ. बी. ई. ( सेवानिवृत्त )

**उपाध्यक्ष :** प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी., डी. एस्सी.,

**नैधिक :** प्रा. स. वि. आपटे, एम्. ए., बी. एस्सी., बी. इ. एस्. ( सेवानिवृत्त )

**कार्यवाह :** ( १ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( २ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.

**सदस्य :––** ( १ ) श्री. द. गो. फडके, बी. ए. एल्एल. बी.
( २ ) श्री. वि. धों. गोरे शास्त्री.
( ३ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ४ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ५ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ६ ) श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.
( ७ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.

| | |
|---|---|
| To Research Reserve Fund. | 500–00 |
| Building & Equipment Fund. | 26–00 |
| Life Member subscription Fund. | 200-00 |
| Total Rs. | 1,979–29 |

| | |
|---|---|
| Total Rs. | 1,979–29 |

Dated at Poona : 20th July, 1972
Trustees Sd. S. G. Kajarekar
Secretary
Sd. S. V. Apte
Treasurer

As per our/my report of even date
Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants,
Auditors.



G. D. APTE & CO.
Chartered Accountants
5/4/7

Phone : 57872
United Western Bank Bldg
Laxmi Road, Poona 2

Schedule VIII
Vide Rule 17 ( 1 )

Dated : 20th July, 1972

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Balance Sheet as at 30th June 1971.

| FUNDS AND LIABILITIES | | Rs. P. | ASSETS | | Rs. P. |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus : | | 1,983–25 | Library Books : | | |
| 1 ) Research Fund. | | | As per last B/S. | 1,240–22 | |
| As per last B/S. | 3,500–00 | | Additions during the year | 1–50 | |
| Provision during the year | 500–00 | 4,000–00 | | 1,241–72 | |
| 2 ) Life & Member subscriptions Fund. | | | Less : Depreciation | 124–17 | 1,117–55 |
| As per last B/S. | 501–00 | | Furniture & Fixtures : | | |
| Additions during the year | 200- 00 | 701–00 | As per last B/S. | 414–42 | |
| 3 ) Building & Equipment Fund : | | | Less : Depreciation. | 41–42 | 373–00 |
| As per last B/S. | 3,186–00 | | Equipment Account : | | |
| Additions during the year | 26–00 | 3,212–00 | As per last B/S. | 1,339–70 | |
| 4 ) Jubilee Fund. | | | Less : Depreciation. | 133–98 | |
| As per last B/S. | | 222–00 | | 1,205–72 | |

## JYOTIRVIDYA PARISANSTHA,

Receipts and Payments accounts for the year ending on 30-6-71

| Receipts | Rs. Ps. | Rs. Ps. | Payments | Rs. Ps. | Rs. Ps. |
|---|---|---|---|---|---|
| 1) Subscription Ordinary members and school | | 340-00 | 1. ESTABLISHMENT EXP. | | |
| 2) Life membership Subscriptions | | 200-00 | a) Salary | 272-62 | |
| 3) Donotion | | | b) Rent. | 125-00 | |
| a) Jabilee Fund | 1-00 | | c) Stationery | 66-90 | |
| b) Petty Donation | 25-00 | | d) Contingencies | 276-20 | |
| (Included in Building and equipment Fund) | | 26-00 | e) Postage | 36-45 | |
| | | | f) Transport charges | 25-80 | |
| | | | | | 802-97 |
| 4) Grant-in-aid Municipal Corporation | | 300-00 | 2. Mise. Expenditure on object :— (Lecturers, Studycircle etc.) | | 175-75 |
| 5) Interest on Bank A/C | | 231-47 | | | |
| 6) Sale of Books | | 44-00 | | | |
| 7) Temporary Advance from Shri.M.N.Gokhale | | 58-70 | 3. Purchase of Book | | 1-50 |
| Opening Balance As on. 1-7-70 | | | Closing Balance As on : 30-6-71 | | |
| Cash-in-hand | 146-12 | | Cash in hand | 317-10 | |
| Cash at Bank | 6016-34 | | Cash at Bank | 6,065-31 | |
| | | 6,162-46 | | | 6,382-41 |
| | | 7362-63 | | | 7362-63 |

Checked and found Correct.
Sd. S. G. Phansalkar
Internal Auditor.



G. D. APTE & CO.
Chartered Accountants

Phone : 57872
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona 2

Schedule IX
Vide Rule 17 (I)
Registered No.

Dated : 20th July, 1972

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA
Income and Expenditure Account for the year ending 30th June, 1971.

| EXPENDITURE | | Rs. | INCOME | | Rs. |
|---|---|---|---|---|---|
| ESTABLISHMENT EXPENSES : | | | By Interest On Bank Accounts | | 231-47 |
| Salary | 272-62 | | By Dividend | | |
| Rent | 100-00 | | By Donations in cash or kind | | 26-00 |
| Stationery | 66-90 | | By Grants | | 300-00 |
| Contingencies | 276-20 | | Selling price of books | 44-00 | |
| Postage | 36-45 | | Less : Cost pricc | 14-50 | |
| Transport charges | 25-80 | | | | 29-50 |
| Total Rs. | | 777-97 | | | |
| To Expenditure on Objects circle ete. | Rs. | 175-75 | INCOME FROM OTHER SOURCES : | | |
| To Depreciation Library Books | 124-17 | | Other subscriptions | | 340-00 |
| Furniture & Dead stock | 41-42 | | Life Membrs' subscription | | 200-00 |
| Equipment A/C | 133-98 | | Profit on sale of Books : | | |
| Total Rs. | | 299-57 | By Deficit carried over to Balance Sheet | | 852-32 |

G. D. APTE & CO.
Chartered Accountants

Schedule IX C
Vide Rule 32
Registered No. of Public Trust
F–44

Phone : 57872
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona 2
Dated : 20th July, 1972

Statement of Income liable to contribution for the year ending 30th June, 1971.

Name of Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA.

| | | Rs. | Rs. |
|---|---|---|---|
| Gross annual income : | | | 1,126–97 |

Details of income not chargeable to contribution under Section 58 and Rule 32 :

( i ) Donation to corpus.
( ii ) Donations
(iii) Grants by Government and other Local Authorities.
(iv) Interest on Sinking or Depreciation Fund.
( v ) Amount spent for the purpose of education.
(vi) Amount spent for the purpose of medical relief.
(vii) Deductions out of income from lands used for agricultural purposes.
  (a) Land Revenue and Local Fund cess.
  (b) Rent payable to superior landlord.
  (c) Cost of productions, if lands are cultivated by trust.
(viii) Dedutions out of income from lands used for non-agricultural purposes.
  (a) Assessment, Cesses and other Govt. or Municipal Taxes.
  (b) Ground rent payable to the superior landlord.
  (c) Insurance premia.
  (d) Repairs at $8\frac{1}{3}$ per cent of gross rent of buildings.
  (e) Cost of collection at 4 per cent of gross rent of buildings let out.
( ix ) Cost of collection of income or receipts from securities, stocks, etc. at 1 per cent of such income.
( x ) Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at $8\frac{1}{3}$ per cent of the estimated gross annual rent.

The Institution is a public Trust exclusively for advancement and propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31 (1) (a) of the Bombay Public Trust Rules, 1951.



Income liable to contribution Rs. NIL.

Dated at Poona : 20th July, 1972
Trustees Sd. S. G. Kajarekar, Secretary.
Sd. S. V. Apte, Treasurer.

Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants

## नवसदस्यांचें स्वागत

या वर्षी पुढील व्यक्तींना संस्थेचें सदस्यत्व देण्यांत आलें.

आजीव सदस्य ( १ ) श्री. जमशेट डी. कापडिया, आय्. सी. एस्. ( निवृत्त )
( २ ) प्रा. रँग्लर श्री. वि. वा. नारळीकर, एम्. ए. ( केम्ब्रीज )

सामान्य सदस्य ( १ ) श्री. शरद गजानन जोशी, एम्. एस्सी.
( २ ) श्री. जयंत शांताराम जोशी, बी. एस्सी.

## आभार

परिसंस्थेचे सदस्य, हितचिंतक व विज्ञानप्रेमी जनतेनें संस्थेच्या कार्यांत जें साहाय्य केलें त्याचा आभारपूर्वक उल्लेख करून हें निवेदन संपवितों.

आपले

**स. ग. काजरेकर**
**स. चिं. मराठे**



G. D. APTE & Co.
Chartered Accountants

Phone : 57872
United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2

Dated : 20th July, 1972

With the Assistant Charity Commissioner, Poona
In the matter of Act XXIX of 1950
and
In the matter of
JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA
Public Trust
Public Trust No. F–44

Audit for the year ending 30th June, 1971.

We, the undersigned Auditors, hereby report that :—

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the Rules;
(b) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;
(c) The vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts:
(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by us were produced before us;
(e) Inventory certified by the trustee of the movables of the public trust has been maintained;
(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;
(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust.
(h) The amounts of outstandings for more than one year are Rs. NIL and the amounts written off are Rs. NIL.
(i) Tenders were/were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000–00. Not applicable.
(j) Any money of the public trust has not been invested contrary to the provisions of Sec. 35.
(k) Alienations of the immovable property contrary to the provision of Sec. 36 have not come to our notice.

G. D. APTE & CO.
Chartered Accountants.

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

## उपयुक्त व संग्राह्य

( १ ) **सूर्यकुल**—( संग्राहक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे ) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक, अद्ययावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा, विद्वानांनीं एकमुखानें वाखाणलेलें व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेनें ( डेकन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें ) पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठसंख्या २८०, किंमत रु. ५. दुसरी आवृत्ती तयार होत आहे.

* * *

( २ ) **तारकानगरी**—तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्बोधक माहिती. तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गति कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याहि प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ४।—रुपये.

* * *

( ३ ) **ताराचित्रक संच**—( आवृत्ति दुसरी, दोन रंगांत छपाई ) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेच तारीख वेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसूं शकेल त्याचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमें ४०×३० व २७×२२॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाहि मिळते. सर्व संचाची किंमत रु. १·५०

* * *

( ४ ) **वेधसाधनें व वेधशाळा**—प्राचीन काळापासून वेध घेण्याचीं साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणती पुढें कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्योतिष्यक ( Radio Astronomy ) या विषयांची माहिती या ग्रंथांत सुबोध रीतीनें दिली आहे. किं. रु. २·७५

* * *

( ५ ) **चंद्रप्रभा**—चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख, चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती, ओहोटी वगैरे संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्सलेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. २·५०.

* * *



( ६ ) **विश्वाची रचना व उत्क्रांति**—( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभ्रिका, दीर्घिका, काय आहेत व या विश्वाची उत्क्रांति कशी होत आहे, यासंबंधी सोपपत्तिक माहिती. पृष्ठें ४५. किंमत रु. ०·७५.

* * *

( ७ ) **संज्ञावली**—ज्योतिष्यकशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचे अर्थ व विवरण. पृष्ठें २३. किंमत रु. ०·२५. दुसरी आवृत्ती तयार होत आहे.

* * *

( ८ ) **छोट्या पुस्तिका व प्रकाशनें; निबंध**—( १ ) **कालमापन व त्यांचीं साधनें** ( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) काल म्हणजे काय, त्याचें मापन इ. खुलासा. ( २ ) **पाश्चात्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहास**—( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) ख्रिस्तपूर्व दीड हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल यांची माहिती. ( ३ ) **सूर्याचें अंतरंग**—( लेखक : प्रा. दा. गो. ढवळे ) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. ( ४ ) **सूर्यदेवता**—( लेखक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय ) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख. ( ५ ) **आर्यांच्या मूळ वसतिस्थानासंबंधीं झालेल्या व्याख्यानमालेंतील मुद्द्यांचें टांचण**. वरील सर्व छोट्या पुस्तकांची किंमत प्रत्येकी रु. ०·१२.

* * *

**टीप** :—१. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविलीं जात नाहींत. २. टपाल हशिलासह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें शाळा—कॉलेजांना व ग्रंथसंग्रहालयांकरितां उपयुक्त आहेत.

* * *

**मागणी**—( १ ) **स. ग. काजरेकर**, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, १६१६ सदाशिव, पुणे ३० या पत्त्यावर;

अथवा

( २ ) इन्टर नॅशनल बुकसर्व्हिस, पुणे ४ या पत्त्यावर करावी.

---

प्रकाशक : स. ग. काजरेकर, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, सदाशिव, पुणे ३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ३०.

( ४ ) १९–२–७१ 'Measuring Instruments in a Science Laboratory' Post Graduate Physics Department, Ahmednagar CollegeAhmednagar.

( ५ ) २२–२–७१ 'Instrumentation in Modern Times' "Science Today" Programme for the International Education year, Willingdon College, Sangli.

( ६ ) २२–२–७१ 'The Expance of the Stellar Universe.'

( शेवटचीं दोन व्याख्यानें या कार्यक्रमासंबंधींच्या विशेष नियतकालिकांत नंतर प्रसिद्ध झालीं. )

**श्री. मो. ना. गोखले**

( १ ) २७–८–७० 'पृथ्वीच्या गती आणि त्यांचे परिणाम' बाई मोटलीबाई अध्यापिका विद्यालय, पुणें.

( २ ) १५–११–७० 'अंतराळ संशोधनाचीं १५ वर्षें'–महात्मा फुले वस्तु संग्रहालय.

( ३ ) २–१–७१ 'अर्नेस्ट रूदरफोर्डची गोष्ट'—बालोद्यान, पुणें आकाशवाणी.

( ४ ) २–१–७१ 'कै. विक्रम साराभाई यांना श्रद्धांजली' पुणें आकाशवाणी.

( ५ ) २१–२–७१ 'मानव आणि अंतराळ'–Science Today Symposium, Willingdon College, Sangli.

( ६ ) २०–५–७१ 'टरबाइन'—पुणें आकाशवाणी.

**श्री. स. ग. काजरेकर,**

१६–११–७० 'द्विमान पद्धती व तिचा गणकयंत्रात उपयोग' महात्मा फुले वस्तुसंग्रहालय.

## स्फुट लेख, ग्रंथलेखन, ग्रंथपरीक्षण

प्रि. गो. रा. परांजपे यांनीं परिश्रमपूर्वक संपादिलेला परिभाषाविषयक ग्रंथ '**वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा**' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळानें प्रकाशित केला. या कोशांत वास्तव, रसायन, ज्योतिःशास्त्र, गणित हे विषय आलेले आहेत.

**डॉ. मो. वा. चिपळूणकर**

( १ ) 'अवकाश युगांतील पुढचें पाऊल' रविवार सकाळ १९–७–७०



( २ ) 'तारका विश्वासंबंधीं गाजलेलें एक वाग्युद्ध'–केसरी २६–७–७०

( ३ ) 'निसर्ग आणि वैज्ञानिक मानव'–स्वराज्य साप्ताहिक १५–८–७०

( ४ ) 'दुर्बिणीची मांडणी'–सृष्टिज्ञान, डिसेंबर १९७०

( ५ ) 'चाळीस वर्षांपूर्वी सापडलेला प्लूटो'–केसरी, रविवार २७–१२–७०

( ६ ) 'सावलीचें घड्याळ आणि लंबकाचें घड्याळ' शालापत्रक, विज्ञान विशेषांक जानेवारी १९७१

( ७ ) 'विविध दिनदार्शीका'–स्वराज्य साप्ताहिक ३०–१–७१

( ८ ) 'विज्ञान लोकाभिमुख करणारे प्रि. गो. रा. परांजपे' रविवार सकाळ ३१–१–७१–

( ९ ) 'दीर्घतमस आणि सूर्य' ( ग्रंथपरीक्षण ) सृष्टिज्ञान, मार्च १९७१

( १० ) 'आपली सूर्यमाला' ( ग्रंथपरीक्षण ) पुणें विद्यापीठ व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभा यांसाठी.

( ११ ) 'आइन्स्टाइन्च्या सापेक्षतावादाचीं मूलतत्त्वें' ( ग्रंथपरीक्षण ) सृष्टिज्ञान, जून १९७१.

( १२ ) 'वृश्चिक राशींतील बीटा ताऱ्याचें गुरु बिंबानें केलेलें पिधान'–सृष्टिज्ञान, जून १९७१

**श्री. मो. ना. गोखले**

( १ ) 'मिररस्कीन अर्थात प्रतिबिंबित पडदा'–सृष्टिज्ञान मार्च १९७१

( २ ) 'दुर्लभ ज्योतिष्यकीय आविष्कार–गुरु अनुराधा नक्षत्रांतील ताऱ्याचें पिधान करणार'—सृष्टिज्ञान मे १९७१

( ३ ) 'ज्योतिष्यकीय आविष्कार'–रविवार सकाळ १६–५–७१

( ४ ) 'आपली सूर्यमाला' ( ग्रंथ-परीक्षण ) महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेकरितां.

**श्री. वि. वि. मोडक**

( १ ) 'रडारनें वादळाची पूर्वसूचना' विज्ञानयुग, सप्टेंबर १९७०

( २ ) 'फलज्योतिष हें शास्त्र आहे काय ?' विज्ञानयुग, ऑक्टोबर १९७०

( ३ ) 'विशाखापट्टणचे रडार आणि चक्रीवादळें' जीवनशिक्षण, ऑक्टो. ७०

**श्री. य. रा. नेने**

'हवामानाचे वेध आणि उपग्रह' रविवार सकाळ २३-८-७०

**श्री. मा. भ. पंत** यांनीं 'दीर्घतमस् व सूर्य' हें वेदांतील ज्योतिःशास्त्र व विशेषेंकरून वेदांतील सूर्य यासंबंधीचें संशोधनपर पुस्तक लिहून कार्तिक शु. ९ शके १८९२–७-११-१९७० ला प्रकाशित केले.



प्रा. ना. म. आठवले यांनी परिसंस्थेच्या रौप्य महोत्सवाचे प्रसंगी देणगी दिलेली ४ इंच व्यासाची दुर्बिण.



## अभ्यासमंडळाच्या बैठकी

दर रविवारीं सायंकाळीं चार ते सहा अभ्यास मंडळाची बैठक भरत असे. उपस्थिति ५ ते १० पर्यंत असे. ज्योतिःशास्त्र, अवकाशविज्ञान, वास्तवशास्त्र यांतील अनेक विषयांवर चर्चा होत असे. इंग्रजी, मराठी नियतकालिकांतील नुकत्या प्रसिद्ध झालेल्या एखाद्या शास्त्रीय लेखाचें वाचन व त्यावर चर्चा होई किंवा नियोजित विषयावर चर्चा होई.

## शोकसभा

प्रा. डी. डी. कापडिया व प्रा. मो. ल. चंद्रात्रेय यांच्या दुःखद निधनामुळे संस्थेचे दोन आधारस्तंभ नाहीसे झाले. या थोर दिवंगतांना श्रद्धांजलि वाहण्याकरतां दि. २२-३-७१ ला दुखवट्याची सभा भरली होती. सभेंत पुढील व्यक्तींचीं दिवंगतांना श्रद्धांजलि वाहणारीं भाषणें झालीं.

प्रि. परांजपे, प्रा. द. श्री. जोग, श्री. द. गो. फडके, श्री. गोरेशास्त्री, श्री. मो. ना. गोखले, श्री. नवरे, श्री. पंत, प्रा. कापडियांचे चिरंजीव श्री. जमशेटजी कापडिया, प्रा. नारळीकर व कार्यवाह श्री. काजरेकर.

## संस्थेचें ज्ञानप्रसाराचें कार्य

### व्याख्यानें, व्याख्यानमाला

प्रस्तुत वर्षीं संस्थेनें प्रा. डॉ. **हरि रामचंद्र दिवेकर**,एम्.ए.,डी.लिट्.यांच्या '**वेदांतील नक्षत्रदर्शन**' या विषयावरील तीन व्याख्यानांची एक व्याख्यानमाला गुंफली. व्याख्यानें शिक्षणशास्त्र संस्थेच्या सभागृहांत दि. १३-१२-७०, १४-१२-७० व १५-१२-७० या तारखांना झालीं. प्रतिदिनीं ६० ते ७५ श्रोते उपस्थित असत.

संस्थेच्या सदस्यानीं इतर संस्थांच्या निमंत्रणांवरून दिलेलीं स्फुट व्याख्यानें :

### डॉ. मो. वा. चिपळूणकर

( १ ) १-६-१९७० The microscope-its construction and working; two lectures in the summer school for science teachers, Fergusson college, Poona 4.

( २ ) ११-१२-१९७० The Nature of the Physical Universe–Physics Association N. Wadia College, Poona-1.

( ३ ) १७–१२–७० 'विश्वाचा पसारा' सायन्स ॲसोसिएशन् डे. ए. सो. चें हायस्कूल, पिंपरी.

२. प्रा. ह. रा. दिवेकर, श्री. मा. भ. पंत यांचीं वैदिक ज्योतिःशास्त्रा-संबंधीचीं व्याख्यानें ठेवावींत, तसेंच आधुनिक ज्योतिःशास्त्रावरही व्याख्यानें करावीत.

३. वार्षिक सभेच्या आधीं रौप्यमहोत्सवाचा कार्यक्रम करावा, आणि प्रा. नानासाहेब आठवले यांच्या दुर्बिणीच्या स्वीकाराचा समारंभ रौप्य-महोत्सवांत करावा.

४. संस्थेच्या कार्यवाढीकरतां काय करावें याविषयीं संबंधितांचे अभिप्राय, सूचना मिळविण्याकरतां एक प्रश्नावली तयार करून ती सर्व सदस्यांकडे, शाला-प्रमुखांकडे पाठवावी.

( ४ ) दि. १७–१–७१ च्या सभेत, कार्यवाहांनीं तयार केलेल्या आधींच्या वर्षाच्या अहवालास प्रशासक मंडळानें मान्यता दिली. इतर निर्णय.

१. दि. ७ फेब्रुवारी १९७१ ला निकायसभा ( General Body ) बोलवावी असें ठरलें.

२. रौप्य महोत्सवाचा कार्यक्रम निकाय सभेनंतर घ्यावा.

३. प्रामुख्यानें मराठी विज्ञान परिषदेच्या विद्यमानें होणार असलेल्या प्रिं. परांजपे यांच्या सत्कारांत परिसंस्थेनें सक्रिय भाग घ्यावा.

( ५ ) दि. २०–६–७१ ची सभा. या सभेत प्रिं. परांजपे यांनीं प्रा. नारळीकर यांना परिसंस्थेच्या प्राध्यक्षपदाचीं सूत्रें स्वीकारण्याविषयीं विनंती केली. प्रा. नारळीकर यांनीं सम्मतिदर्शक भाषण करून प्राध्यक्षपदाचा स्वीकार केला.

**वार्षिक निकायसभा**

वार्षिक निकायसभा दि. ७ फेब्रुवारी १९७१ ला भरली. प्रथम सभेला सादर केलेला आधींच्या वर्षाचा अहवाल ( किरकोळ दुरुस्तीसह ) व जमाखर्च आणि चालू वर्षाचा निकल्प ( खर्चाचें अंदाजपत्रक ) सम्मत झाले. काम-काजाच्या दुसऱ्या ठरावांत, सभेनें कार्यवाहाच्या पदावरून श्री. मो. ना. गोखले हे निवृत्त होत असल्यानें श्री. स. ग. काजरेकर यांची त्या जागीं निवड केली. तत्पूर्वीं श्री. गोखले, श्री. वि. वि. मोडक व श्री. काजरेकर यांचीं एतद्विषयक भाषणें झालीं.

प्रिं. परांजपे यांनीं ८१ व्या वर्षांत पदार्पण केल्यानिमित्त सभेनें त्यांचें अभीष्टचिंतन केलें.

आगामी कालांत संस्थेनें कोणते उपक्रम हातीं घ्यावेत याविषयीं व संस्थेच्या वाढीसंबंधींच्या अनेक बाबींवर यानंतर विचार झाला.

आभारानंतर सभेचें काम संपलें.

**नैधिक** :—प्रा. स. वि. आपटे, एम्. ए., बी. एस्सी., बी. ई. एस्. (सेवानिवृत्त)

**कार्यवाह** :—( १ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( २ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.

**सदस्य** : —( १ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, एम्. ए., बी. ई. एस्.( सेवानिवृत्त )
( २ ) श्री. द. गो. फडके, बी. ए., एल्एल्. बी.
( ३ ) श्री. वि. धों. गोरे शास्त्री.
( ४ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ५ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ६ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ७ ) श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.
( ८ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.
( ९ ) श्री. वि. वि. मोडक, जी. डी. सी, जी. सी. सी.
(१०) श्री. श्री. शं. पतके, एम्. ए., बी. टी.
(११) श्री. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.

**अंतर्गत समाध्यय-निरीक्षक** :—श्री. श्री. गो. फणसळकर, बी. ए.

**तांत्रिक मंडळ** :—

( १ ) प्रि. गो. रा. परांजपे
( २ ) डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ३ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय
( ४ ) प्रा. स. वि. आपटे
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. द. श्री. जोग.
( ७ ) श्री. मा. भ. पंत ( निमंत्रक )

प्रस्तुत वर्षाच्या उत्तरार्धात मार्चमध्यें फार दुःखाच्या दोन घटना घडल्या. संस्थेचे प्राध्यक्ष प्रा. डी. डी. कापडिया हे १० मार्च १९७१ ला इहलोक सोडून गेले. मृत्युसमयीं त्यांचें वय ९७ वर्षांचें होतें. परंतु या उतारवयातही संस्थेच्या कामाकडे अत्यंत आस्थेनें त्यांचें लक्ष असे. शिक्षणक्षेत्रांतील एक अग्रणी व संस्थेचे प्रथमपासूनचे प्राध्यक्ष अशा प्रा. कापडियांच्या निधनानें संस्थेची फार मोठी हानी झाली.

या दुर्घटनेच्या पाठोपाठ प्रा. मो. ल. चंद्रात्रेय यांच्या मृत्यूचा धक्का बसला ! संस्थेच्या स्थापनेपासून तिच्या प्रगतीकरतां अव्याहतपणें कार्य करणारे



प्रा. मो. ल. उपाख्य तात्यासाहेब चंद्रात्रेय हे दि. १३ मार्च १९७१ ला स्वर्गवासी झाले. अलिकडचीं कांहीं वर्षे उतारवय आणि तब्येतीची असमर्थता यांना न जुमानता ते संस्थेच्या कार्यक्रमांत भाग घेत असत. त्यांनीं आपला सर्व ग्रंथसंग्रह संस्थेच्या स्वाधीन केला आहे. संस्थेच्या ग्रंथालयांत ती मोलाची भर पडली आहे.

या घटनांमुळें संकल्पित रौप्य महोत्सवासंबंधींचा कार्यक्रम स्थगित करावा लागला. प्राध्यक्षपदाचीं सूत्रें कुणा समर्थ व्यक्तीवर सोपवावीत याविषयीं विचार चालू असतां प्रा. रँग्लर वि. वा. नारळीकर, पुणें विद्यापीठातील लो. टिळक अध्यासनाचे गणिताचे प्राध्यापक यांचें नाव सर्वानुमतें सुचविलें गेलें. प्रा. नारळीकरांनीं संस्थेच्या विनंतीस मान्यता दिली, व दि. २० जून १९७१ च्या प्रशासक मंडळाच्या सभेंत त्यांनीं प्राध्यक्षपदाचीं सूत्रें स्वीकारलीं.

## वृत्तान्तवर्षांतील कार्याचें इतिवृत्त

### सभा, बैठकी

### प्रशासक मंडळाच्या सभा

( १ ) दि. ५–७–१९७० च्या सभेंत कार्यालयाचें स्थलांतर कोठें करावें याविषयीं विचार झाला. लो. टिळक स्मारक मंदिराच्या विश्वस्तांनीं परिसंस्थेनें मंदिरांतील जागा लवकर सोडावी अशी सूचना केली होती. प्रि. परांजपे यांनीं संस्थेचें सामान ठेवण्याकरतां त्यांच्या बंगल्याच्या आवारांतील कांहीं जागा देऊं केली. इतरत्रही सोयीची जागा मिळविण्याचे प्रयत्न चालू ठेवावेत असें ठरलें.

( २ ) दि. २५–१०–१९७० च्या सभेंतही प्रामुख्यानें कार्यालयाच्या स्थलांतराविषयीं विचार झाला. शनिवार पेठेंतील श्री. केतकर यांच्या संग्रहालयाच्या जागेपैकीं एक खोली मिळूं शकेल असें कळलें होतें. तसेंच, मुकुंदनगरमधील वैदिक संशोधन मंडळाच्या इमारतींतील कांहीं जागा मिळण्याची शक्यता कळली होती. ही जागा दूर अंतरावरची म्हणून कार्यालयाकरतां गैरसोयीची असली तरी वैयक्तिक अभ्यासाकरितां उपयुक्त ठरेल म्हणून ती मिळवावी असें ठरलें. दुसऱ्या ठरावान्वयें ' आजीव सदस्यांचें शुल्क कायमनिधींत जमा करावें व अल्पदेणगीदारांच्या देणग्या या साधनसंभार निधींत जमा कराव्यात ' असें ठरलें.

( ३ ) दि. ८–११–७० च्या सभेंत पुढील निर्णय झाले :

१. कार्यालयाच्या स्थलांतराचा अंतिम निर्णय झाला. नेहमीं न लागणारें जड सामान श्री. केतकरांच्या खोलींत ठेवावें व प्रि. परांजपे यांच्या जागेंत ग्रंथालय, टेबल, खुर्च्या इ. अभ्यास मंडळाला आवश्यक असणारें सामान हलवावें असें ठरलें.

## वार्षिक निकायसभेचें निमंत्रण

चालू २९ व्या वर्षाची **निकायसभा** ( General Body Meeting ) **रविवार दि. १७ सप्टेंबर १९७२** ला सायंकाळीं ५ वाजतां **महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या सभागृह, टिळक पथ, पुणें** येथें भरेल. त्यावेळीं पुढील क्रमणिकेंत दिलेलें कामकाज होईल. तरी सर्व सदस्यांनीं सभेस अवश्य उपस्थित राहावें ही विनंती.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.
( २ ) ( १९७०–७१ ) च्या निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षातील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
( ५ ) नवीन वर्षाकरिता ( १९७२–७३ ) पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) १९७२–७३ मध्यें संस्थेनें हातीं घ्यावयाचीं कामें.
( ७ ) १९७२–७३ च्या निकल्पावर चर्चा.
( ८ ) आयत्या वेळचे विषय ( अध्यक्षांच्या अनुमतीनें )
( ९ ) प्राध्यक्षांचें भाषण.
(१०) आभार.

आपले

**स. ग. काजरेकर**
**स. चिं. मराठे**
कार्यवाह

पुणें, १३ ऑगस्ट १९७२

**टीप**—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वीं निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।

**स्थापना : गणेशचतुर्थी शके १८६६ ता. २२-८-१९४४**

## सन १९७०-७१ चा ( २७ व्या वर्षाचा ) वृत्तान्त

प्रिय सदस्य,

३० जून १९७१ ला संपणाऱ्या कार्यकारी वर्षाचा हा अहवाल वास्तविक आम्ही आपणांस सुमारें वर्षापूर्वीच सादर करावयास हवा होता; पण अनेक कारणांमुळें हें वेळेवर घडलें नाहीं, याबद्दल आम्हास दिलगिरी वाटते. दि. ११ जून १९७२ ला प्रशासक मंडळापुढे आम्हीं हें निवेदन केलें होतें व आपणांस त्याचा इत्यर्थ कळविला होता.

### वृत्तान्तवर्षातील पदाधिकारी

दि. ७-२-७१ रोजीं भरलेल्या निकायसभेनें प्रस्तुत १९७०-७१ या वर्षाकरितां **प्रशासक मंडळावर** व **तद्विद्य मंडळावर** पुढील सन्मान्य सदस्यांची निवड केली.

**प्रशासक मंडळ** ( Governing Council )

**प्राध्यक्ष :** प्रा. डी. डी. कापडिया, एम. ए., बी. एस्सी; आय. ई. एस. ( सेवानिवृत्त )

**अध्यक्ष :** प्रि. गो. रा. परांजपे, एम्. एस्सी., एफ. एन्. आय, ओ. बी. ई. ( सेवानिवृत्त )

**उपाध्यक्ष :** प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी, डी. एस्सी.,